महाराष्ट्र शासन

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२८, क्वीन्स् गार्डन, पुणे - ४११००१

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद पुणे येथे संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता परीक्षापूर्व अनिवासी व नि:शुल्क प्रशिक्षण कार्यक्रम**

महाराष्ट्र शासन अदिवासी विकास विभागाच्या अदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) यांच्या अर्थिक सहाय्यतेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंदामध्ये अनुसूचित जमाती (ST Category) या प्रवर्गातील UPSC (Civil Services) Examination - 2019 परीक्षापुर्व प्रशिक्षणासाठी कमाल ८ महिन्याच्या कालावधीकरीता ७५ जागांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**प्रशिक्षण-कालावधीत मिळणारे लाभ रु. ४,०००/- प्रतिमाह विद्यावेतन + रु. ६०००@- पुस्तकसंचसाठी**

**१. प्रवेश क्षमता :-**

| ठाणे विभाग (२५ जागा) | नाशिक विभाग (२५ जागा) | पुणे विभाग (२५ जागा) |
|---|---|---|
| कोकण विभागातील सर्व जिल्हे | नाशिक, नंदूरबार आणि अहमदनगर | पुणे, सोलापुर आणि उर्वरित महाराष्ट्र |

**परीक्षा केंद- पुणे, ठाणे आणि नाशिक**

* विभागनिहाय आरक्षित जागा :- महिलांसाठी ३० टक्के व दिव्यांगासाठी -३ टक्के

**२. प्रवेश परीक्षा अभ्यासक्रम** :-प्रवेश परीक्षा एकूण २०० गुणांची असेल व प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम UPSC Civil Services पूर्व परीक्षेप्रमाणे (UPSC Preliminary Examinations) राहील.

- **प्रवेश परीक्षा पध्दती :-**

| विषय | प्रश्नसंख्या | गुण | माध्यम | परीक्षा कालावधी | परीक्षा स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य अध्ययन (GS) Section - I | ७० | १४० | मराठी/English | सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत | **वस्तुनिष्ठ** Objective type (MCQ) **(No Negative Marking)** |
| सामान्य अध्ययन (CSAT) Section - II | ३० | ६० | मराठी/English | | |
| एकुण | १०० | २०० | | | |
| अंतिम निवड यादी ही दोन्ही विषयांच्या एकत्रीत प्राप्त गुणांवर आधारीत राहील. | | | | | |

**३. अर्ज करण्याची प्रक्रिया** :- प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने www.cec.unipune.ac.in या वेबसाईट व्दारे दि. ०९. ०४. २०१८ ते दि. २३. ०४. २०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. भरल्यानंतर

**४. प्रवेश अर्ज शुल्क** :- रुपये ३००/- ऑनलाईन पध्दतीने अथवा चलनाव्दारे भरता येईल. (चलनाव्दारे शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २८. ०४. २०१८ असेल)

**५. पात्रतेच्या अटी :-**

- शैक्षणिक अर्हता :- मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच वैद्यकीय पदवी धारकांनी Internship पुर्ण करणे आवश्यक आहे.
- उमेदवार हा अनुसुचित जमातीतील महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहीजे. **(Domecile of Maharashtra)** किंवा महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सिमा भागातील रहिवासी असल्यास शासन निर्णय क्रमांक रा. प्र. व्य. १०१८/१७१/९८/ म. शि-१ दि. २४. ०४. २००० नुसार प्रवेश पात्र राहील.
- निवड झालेल्या उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराचे कौटुंबिक उत्पन्न रुपये ८. ०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.
- संपुर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभागी होता येणार नाही.
- वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय २१ ते ३७ वर्षे दरम्यान असावे.

**६. परीक्षा दिनांक :-०६ मे २०१८** (दिनांक बदल व इतर अद्यावत माहितीसाठी उमेदवाराने www.cec.unipune.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी भेट देणे आवश्यक आहे)

**७. परीक्षा प्रवेश पत्रासंबंधी :-**

- परीक्षा प्रवेशपत्र (Entrance Hall Ticket) दि. ३. ०५. २०१८ नंतर www.cec.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ०२०-२५६९०३४२/२५६०१३४५/२५६०१३४६
- प्रवेश परीक्षेदरम्यान प्रवेशपत्र व कोणताही एक शासनमान्य ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

❖ अंतिम प्रवेश, विद्यावेतन आणि पुस्तकसंच यासंबंधी अर्थिक बाबींचे सर्व अधिकार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांचेकडे असतील.